**महाराष्ट्र शासन**
**शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे ४११ ००१.**

Web - www.dhepune.gov.in Email - mavi.dhepune@gov.in

फोन नं. ०२०/२६१२७८३३, २६०५१६३२ फॅक्स नं. ०२०/२६०५१६३२

क्रमांक -उशिसं/अमवि/२०१९/एचटीई तां.माहिती/मवि-२/13921 दिनांक— १७/१०/२०१९

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक,
(उच्च शिक्षण)

17 OCT 2019

**विषय - एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये येणा-या अडचणी दूर करणेबाबत.**

संदर्भ - या कार्यालयाचे पत्र क्रमांक अमवि/२०१९/एचटीई नोडल अधि. माहिती/ मवि-२/१३२६९ दिनांक २७ सप्टेंबर, २०१९.

या कार्यालयाच्या संदर्भामध्ये नमूद केलेल्या पत्राचे कृपया अवलोकन करावे. सदरहू पत्रान्वये कळविल्याप्रमाणे एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये येणा-या अडचणींचे निवारण करण्यासाठी आपल्या कार्यालयामध्ये नोडल अधिका-यांची नेमणूक करण्यात आलेली आहे.सदरच्या तक्रार निवारणाची माहिती विहीत नमुन्यामध्ये प्रत्येक महिन्याच्या १ तारखेला या कार्यालयास सादर करण्याबाबत कळविलेले आहे.

या अनुषंगाने आता खालीलप्रमाणे आपणास सूचना देण्यात येत आहेत.

१. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ज्या अशासकीय अनुदानित महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठांना त्यांचे वेतन अथवा इतर देयक तयार करण्यामध्ये अडचणी येत आहेत, अशा सर्व महाविद्यालयांना/अकृषी व अभिमत विद्यापीठांना येणा-या अडचणी व त्रुटी याबाबत आपल्या कार्यालयाशी पत्रव्यवहार करुन सोडविण्याबाबत विनंती करण्यात यावी.

२. आपल्याकडे प्राप्त झालेल्या अडचणी/त्रुटी बाबत प्रथमतः आपण आपल्या स्तरावर कार्यवाही करुन संबंधीत अडचणी/त्रुटी दूर कराव्यात व तसे संबंधीत महाविद्यालयास/अकृषी व अभिमत विद्यापीठास कळविण्यात यावे.

३. आपल्याकडे प्राप्त झालेल्या अडचणी/त्रुटी दूर करणे आपल्या स्तरावर शक्य नसल्यास सबंधीत महाविद्यालयास /अकृषी व अभिमत विद्यापीठास एचटीई सेवार्थ प्रणालीमधील **Lodge Complaint** मध्ये जाऊन त्यांची त्रुटी/अडचण रजिस्टर करण्यास सांगण्यात यावे. व त्याचा स्क्रीन शॅाट घेऊन व कम्प्लेंट नंबरसह त्याबाबतचा पत्रव्यवहार आपल्या कार्यालयास करण्याबाबत कळविण्यात यावे. तदनंतर आपल्याकडे दिवसअखेर अशाप्रकरणी ज्या त्रुटी/अडचणी निर्माण होतील त्या सर्व अडचणी/त्रुटी आपण आपल्या पत्राद्वारे व संबंधीत महाविद्यालय/अकृषी व अभिमत विद्यापीठांच्या पत्रासह htesevaarth.dhepu-mh@gov.in या ईमेल आयडीवर सादर करण्यात याव्यात. Complaint Number उपलब्ध न झाल्यास किमान त्याचा स्क्रीन शॅाट असणे आवश्यक आहे.

४. तदनंतर आपण उपस्थित केलेल्या अडचणी/त्रुटी संचालनालय स्तरावर सोडविण्याचा प्रयत्न केला जाईल. आपण उपस्थित केलेल्या अडचणी/त्रुटी संचालनालय स्तरावरुन दूर करण्यात आल्यास त्याबाबत आपणास इमेलद्वारे कळविण्यात येईल. मात्र, सदरहू अडचणी/त्रुटीचे निराकरण संचालनालय स्तरावर न झाल्यास आपल्या अडचणी/त्रुटी शासनास कळविण्यात येऊन त्याबाबत शासनाकडून होणा-या पत्रव्यवहाराबाबत आपणास कळविण्यात येईल, यासाठी शासन स्तरावर संपर्क साधण्याचा प्रयत्न करु नये.

५. सदरहू सूचना ह्या फक्त तांत्रिक अडचणींसाठीच देण्यात येत आहेत. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये जी माहिती भरण्यात आलेली आहे त्यामध्ये बदल करण्यासाठी उदा. सेवानिवृत्ती दिनांकामध्ये बदल करणे,प्राचार्यांच्या वयोमर्यादेमध्ये वाढ करणे,महाविदयालयाच्या नावात बदल करणे याबाबत सध्या चालू असलेली पद्धतीच वापरण्यात यावी.

६. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये ज्या अनुदानित महाविद्यालये/अकृषी व अभिमत विद्यापीठांना त्यांचे वेतन अथवा इतर देयक तयार करण्यामध्ये अडचणी येत आहेत अशा सर्व महाविद्यालयांना/अकृषी व अभिमत विद्यापीठांना येणा-या अडचणी व त्रुटी या कार्यालयाकडे सादर करताना खालील नमुन्यामध्ये सादर करण्यात याव्यात.

Name of The College/Institute/University -
HTE SevaarthID of the College/Institute/University -
Password of the College/Institute/University -

| S.N. | Description | Particulars |
|---|---|---|
| 1 | Ticket No. | |
| 2 | Title | |
| 3 | Screen Name | |
| 4 | Description | |
| 5 | UserID of the College/Institute/University | |
| 6 | Password of the College/Institute/University | |
| 7 | Mobile No. of - | |
| | Principal | |
| | College/Institute/University Employee concern with HTE Sevaarth | |
| 8 | Email id of College/Institute/University | |
| 9 | History | |

७. एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये काम करतांना आपल्यालादेखील काही अडचणी/त्रुटी उद्‌भवत असल्यास त्यादेखील वरीलप्रमाणे या कार्यालयास पाठविण्यात याव्यात.

तरी वर दिलेल्या सूचना विचारात घेऊन त्याप्रमाणे योग्य ती कार्यवाही करण्यात यावी.

(डॉ. धनराज माने)
शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, पुणे १

प्रत: मा.सचिव,उच्च व तंत्रशिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव सविनय सादर.

महाराष्ट्र शासन
शिक्षण संचालनालय, (उच्च शिक्षण)
महाराष्ट्र राज्य, मध्यवर्ती इमारत, पुणे -४११००१
Web : www.dhepune.gov.in E-Mail : mavi.dhepune@gov.in
फोन नं.०२०/२६१२२११९, २६०५१५१२, २६१३०६२७, २६१२४६३९ फॅक्स नं.०२०/२६१११११५३

क्रमांक - अमवि/२०१९/एचटीई सेवार्थ तां.अडचणी/मवि-२/13922 दिनांक - ०४.१०.२०१९.

17 OCT 2019

प्रति,

सर्व विभागीय सहसंचालक
उच्च शिक्षण

**विषय: एचटीई सेवार्थ तांत्रिक अडचणीबाबत...**

**संदर्भ : कक्ष अधिकारी (आस्था-२) उच्च व तंत्राशिक्षण विभाग मंत्रालय मुंबई यांचा ईमेल दि.३/१०/२०१९**

उपरोक्त विषयास अनुसरुन संदर्भिय ईमेलद्वारे कळविणेत आलेनुसार उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या उच्च शिक्षण संचालनालयांतर्गत राज्यातील अशासकीय अनुदानित महाविदयालये व विदयालपीठामधील शिक्षक/शिक्षकेत्तर कर्मचा-यांचे वेतन व भत्यांची देयके एचटीई सेवार्थ प्रणालीद्वारे तयार करून सहसंचालक कार्यालय स्तरावरून या प्रणालीमार्फत अदा करण्यात येते. तथापि एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये येणा-या विविध तांत्रिक अडचणीबाबत संस्था व महाविदयालय स्तरावरून शासनास थेट संपर्क करण्यात येत असल्याने दैनंदिन कामकाजात गोंधळ व अडचणी उदभवत आहेत,अशी नाराजी शासनाकडून व्यक्त करणेत आलेली आहे. त्याअनुषंगाने आपणास कळविणेत येते की, एचटीई सेवार्थ प्रणालीमध्ये येणा-या विविध तांत्रिक अडचणी यांचे निराकरण व इतर बाबी यांचे हाताळणीसाठी आपले स्तरावर सेवार्थ प्रणाली नोडल अधिकारी तथा तक्रार निवारण अधिकारी यांची नेमणुक करणेत आलेली आहे. त्यामुळे आपले अधिनस्त असलेल्या महाविदयालयांना एचटीई सेवार्थ प्रणालीबाबत उदभवणा-या सर्व तांत्रिक अडचणीबाबत शासनास थेट संपर्क न करता सबंधित नोडल अधिकारी तथा तक्रार निवारण अधिकारी यांचेशी संपर्क करणेच्या सूचना देणेत याव्यात तसेच प्रणालीमध्ये उदभवणा-या अडचणींचे निराकरण करणेसाठी विषयानुरूप प्रस्ताव हा आपले स्तरावरूनच संचालनालय व तदनंतर शासनास सादर होईल याची दक्षता घेणेत यावी. तसेच सदर बाब आपल्या अधिनस्त अशासकीय अनुदानित महाविदयालयांच्या निर्दशनास आणणेबाबत योग्य ती दक्षता घेणेत यावी.

**(डॉ.धनराज माने)**
**शिक्षण संचालक (उच्च शिक्षण)**
**महाराष्ट्र राज्य, पुणे १.**

प्रत:

१.कक्ष अधिकारी (आस्था-२),उच्च व तंत्रशिक्षण विभाग,मंत्रालय मुंबई यांना माहितीस्तव
२.सर्व अशासकीय अनुदानित महाविदयालये यांना माहितीस्तव